# <u>पंतप्रधानांच्या पत्रकार परिषदे विषयी प्रतिक्रिया</u>

**अरुण जेटली**

**विरोधी पक्षनेते (राज्यसभा)**

डॉ.मनमोहन सिंह यांच्या आजच्या पत्रकार परिषदेचा हेतू हे जाहिर करण्याचा होता की, ते लोकसभेच्या निवडणुकींनंतर पंतप्रधानपदी राहणार नाहीत. असे वाटते की ते स्वतःच स्वतःच्या निवृत्तीबद्दल लोकांना जाहीर करत सूटले आहेत. पंतप्रधानांना स्वतःच्या वास्तविकतेविषयी बोलण्यासाठी ऐतिहासिक संधी असते. ती संधी त्यांनी गमावली आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला पराजयाचा सामना करावा लागला होता.

लोकसभेच्या आगामी निवडणुकीत कॉंग्रेसची परिस्थिती बिकट आहे. डॉ.मनमोहन सिंह यांच्या नेतृत्त्ववाली युपिए सरकारच्या कामगिरीची निवडणुकीत अग्नीपरिक्षा असेल. स्वतः पंतप्रधान, महागाई, बेकारी आणि भ्रष्टाचार संपवण्यास असफल ठरल्याचे मान्य केले आहे.

या तिन्ही बाबींचे वादळ निवडणुकीवर घोंघावेल. पंतप्रधान त्या वास्तविकतेची जबाबदारी घेण्याऐवजी असे मत व्यक्त करतात की, इतिहासात त्यांच्या कामगिरीची नोंद होईल. ते पत्रकार परिषदेत वारंवार असे बोलत होते की, वेळ वेळेचे काम करील. पंतप्रधान या बाबत पूर्णतः खोटे आहेत. लोकशाहीत तुमच्या कामगीरीविषयी लोकांनी निर्णय घ्यायचा आहे. पंतप्रधान युपिए-1 सरकारच्या भ्रष्टाचाराप्रकरणी ते काहीच बोलले नाहीत. 2013 च्या निवडणुकीत जो निर्णय लोकांनी दिला तो स्वीकारण्यास पण ते तयार नाहीत.

प्रसार माध्यम, विरोधक आणि नरेंद्र मोदी यांच्यासोबतचे पंतप्रधानांचे संबंध कडवट आहेत. पंतप्रधान कार्यालयाचा असा आग्रह असतो की पंतप्रधानांबाबत सन्मानपूर्वक शब्दाचा वापर करावा. मात्र डॉ. मनमोहन सिंह हे त्या कसोटीत निष्फळ ठरले आहेत. 2002 मध्ये झालेली दंगल ही श्री नरेंद्र मोदी यांच्यासाठी कसोटीची होती. सर्वोच्च न्यायालयाने विशेष तपास टीम ची नेमणुक केली. श्री मोदी हे तीन वेळा सतत निवडणुकीत जिंकले. जनमत चाचणी सांगते की, श्री मोदी पंतप्रधानपदाच्या शर्यतीत सर्वात पुढे आहेत. अशा परिस्थितीत डॉ. मनमोहन सिंह यांनी त्यांच्यासाठी अशा शब्दांचा वापर करणे चुकीचे आहे. ती एक निष्फळ नेत्याची पत्रकार परिषद होती. त्यांनी सत्ता करण्याची इच्छा गमावली आहे. त्यांनी पत्रकार-परिषदेत राष्ट्रीय सुरक्षेबाबत एक शब्द पण उच्चारला नाही. महिलांवरील अत्याचाराबाबत की, गुंतवणूकीबाबत तसेच अर्थव्यवस्थेबाबत खास नोंद घेण्यात आली नाही. कोळसा घोटाळा ते टु-जी ते विरभद्र सिंह लाच प्रकरणाबाबत खास काहीच बोलण्यात आले नाही.

ती पत्रकार परिषद मात्र एक औपचारिकताच होती. मात्र ती एक नाटकीय पत्रकार परिषद होते असेच वाटले.